पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे

अंक १४ वा

२१ नोव्हेंबर १९९४

# नागपूर अधिवेशन
## १२ नोव्हेंबर १९९४
## वृत्तांत

शेतकरी संघटनेचे सातवे व शेतकरी महिला आघाडीचे चौथे असे संयुक्त अधिवेशन १२ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथील कस्तुरचंद पार्कमध्ये पार पडले. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रभरातून आलेल्या लाखो शेतकरी स्त्रीपुरुषांनी, गेले अर्धशतक सातत्याने नेहरूनीतीच्या आधारे शेतकऱ्यांची लूट करत आलेल्या इंडिया शासनाला प्रखर विरोध करण्याचा निर्धार घोषणांच्या गजरात जाहिर केला. या अधिवेशनासाठी पंजाब, हरयाना, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, बुंदेलखंड, आंध्रप्रदेश, कर्नाटक इत्यादी प्रदेशांतून हजारो शेतकरी स्त्रीपुरुषही हजर होते.

खुल्या अधिवेशनाच्या आधी, ११ नोव्हेंबर १९९४ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळात नागपूरच्या डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी अधिवेशन पार पडले. या प्रतिनिधी अधिवेशनास महाराष्ट्रातील सुमारे एक हजार निमंत्रित कार्यकर्ते हजर होते. प्रथम शेतकरी आंदोलनाचा आढावा घेण्यात येऊन खुल्या अर्थव्यवस्थेच्या फलदायी अंमलबजावणीसाठी कार्यक्रमांच्या ठरावांचे मसुदे बनविण्यात आले. (ठराव अन्यत्र देण्यात आले आहेत.)

१२ नोव्हेंबर १९९४ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळात खुल्या अधिवेशनाच्या जागेवरील मंडपात शेतकरी महिला आघाडीचे प्रतिनिधी अधिवेशन झाले. महिला

## अधिवेशन, नागपूर
### ११, १२ नोव्हेंबर १९९४
### ठराव

**ठराव १ : शेतकरीविरोधी कारवायांचा निषेध**

शेतकरी संघटनेचे नागपूर (११/१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन केंद्र शासनाच्या अलिकडील शेतकरीविरोधी कारवायांबद्दल दुःख, चिंता आणि निषेध व्यक्त करते; विशेषतः

धानाचा (उत्तम प्रत) भाव प्रति क्विंटल रु. ३८० जाहिर झाला असतांना पंजाबमधील शेतकऱ्यांना २० रुपये प्रति क्विंटल पड भाव देणे; हरियाणात भाताची खरेदी बंद करणे, या उलट सर्व राज्यांत तांदुळावरील सक्तीची लेव्ही चालू ठेवणे;

कांद्याच्या निर्यातीवर अकस्मात बंदी घालून भाव पाडणे व परिणामतः, कांद्याची साठवणूक खर्चाने व मेहनतीने करणाऱ्या शेतकऱ्यांचे नुकसान करणे;

कापसाच्या निर्यातीचा किमान कोटा गतवर्षी ठरलेला असतानाही चालू वर्षी निर्यातीवर बंदी घालणे;

साखरेची लेव्ही किंमत प्रति क्विंटल ४० ते ५० रुपयांनी कमी करणे व परिणामतः, साखरतुटवड्याच्या वर्षी ऊस शेतकऱ्यांस उत्पादन वाढविण्यास नाउमेद करणे;

साखरेची अनावश्यक आयात करून देशाची तसेच शेतकरी व साखरउद्योग यांची हानी करणे;

शेतीमालावरील उणे सबसिडी अबाधित ठेवून वीज, खते, पाणी इत्यादी निविष्ठांच्या किंमती सबसिडी कमी करण्याच्या बहाण्याखाली वाढविणे;

गॅट करारातील सार्वजनिक वितरण प्रणालीसंबंधीच्या तरतुदी न जुमानता देशातील गरजूंपेक्षा इतरांनाच लाभ करून देणारी व्यवस्था चालू ठेवणे आणि त्यासाठी अन्नधान्याची खरेदी खुल्या बाजारात न करता वसुली, सक्तीची वसुली इत्यादी प्रकारांनी करून शेतकऱ्यांवर त्याचा बोजा घालणे;

दूध व दुधावरील प्रक्रिया तसेच उसाच्या मळीच्या विक्री व वाहतुकीवरील निर्बंधांसंबंधी खुलीकरणाचे धोरण उलटविणे;

महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदी योजना चालू ठेवणे, विजेचे दर वाढवणे, शेतकऱ्यांची जमिन वेगवेगळ्या सबबी आणि बहाणे दाखवून संपादन करणे, सरकारी प्रचंड उणे सबसिडीमुळे दुर्बल झालेल्या शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी कठोर पठाणी कारवाया करणे अशा शेतकरी विरोधी कारवाया चालू ठेवणे

याबद्दल संताप व्यक्त करते.

**ठराव २ : खुल्या व्यवस्थेच्या अंमलबजावणीतील पिछेहाट**

शेतकरी संघटनेचे नागपूर (११/१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन,

प्रतिनिधींनी महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण, दारू दुकान बंदी, लक्ष्मीमुक्ती, खुली अर्थव्यवस्था व महिला, शेतकरी संघटनेचे कर्जमुक्ती आंदोलन या विषयांवर आपल्या अनुभवांच्या साहाय्याने चर्चा केली व त्यांवर ठराव संमत केले.

खुल्या अधिवेशनासाठी १० नोव्हेंबर १९९४ च्या रात्रीपासूनच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून हजारो शेतकरी स्त्रीपुरुष मुलाबाळांसह नागपूरात हजर होऊ लागले. १२ नोव्हेंबरच्या दुपारपर्यंतच कस्तुरचंद पार्क शेतकरी स्त्रीपुरुषांनी ओसंडून वाहू लागले. दुपारी साडेबारा वाजता कस्तुरचंद पार्कपासून शेतकऱ्यांची मिरवणूक सुरू झाली. दुपारी २ वाजेपर्यंत नागपूर शहरातील प्रमुख रस्त्यांवरून फिरून, खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी आपल्याबरोबर येण्याचे सज्जन, उद्योजक स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांना आवाहन करीत, अत्यंत शिस्तीने कस्तुरचंद पार्कमध्ये परत आली. अडीच वाजता कस्तुरचंद पार्कमध्ये तुडुंब भरलेल्या जनसमुदायापुढे इतर राज्यांतून आलेल्या शेतकरी नेत्यांनी त्यांच्या राज्यांतील शेतकऱ्यांच्या सहभावना मांडल्या. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचीही भाषणे झाली.

ठीक पाचता खुल्या अधिवेशनाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरूवात झाली. स्वागताध्यक्ष श्री. पी. एस्. ठाकरे यांनी स्वागत केल्यानंतर अधिवेशनाचे कार्याध्यक्ष श्री. राम नेवले यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला आणि अधिवेशनाला मिळालेल्या या प्रचंड प्रतिसादाने कार्यकर्त्यांचा श्रमपरिहार झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. किसान समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. बिपीनभाई देसाई (गुजरात), शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीचे अध्यक्ष ॲड. मोरेश्वर टेमुर्डे, पंजाबच्या भारती किसान यूनियनचे अध्यक्ष श्री. भूपेंद्रसिंग मान, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल आणि शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर यांनी समोर जमलेल्या अफाट जनसमुदायाला खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी शेतकरी संघटनेने हाती घेतलेल्या कार्यक्रमामध्ये सर्व शक्तीने सहभागी होण्याचे आवाहन केले.

केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी कारवाया (ठराव क्र. १) खुल्या व्यवस्थेच्या काळात आणि गॅट कराराच्या स्वीकृतीनंतर त्यातील तरतुदींविरूद्ध जाऊन करण्यात आल्या या विषयी विशेष चिंता व्यक्त करते.

देशांतर्गत अर्थव्यवस्था आणि परदेशी व्यापाराच्या खुलीकरणाचा सर्वाधिक फायदा देशाला मिळवून देण्याची क्षमता इतर क्षेत्रांपेक्षा शेतीतच आहे हे लक्षात घेता शासनाच्या या कारवाया देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने विशेष घातक ठरतील अशी चिंता व्यक्त करते,

नेहरूप्रणित नियोजनव्यवस्थेचा लाभ मिळालेले नोकरदार, नेता, गुन्हेगार आणि सत्ताधाऱ्यांची कृपादृष्टी असलेले काही कारखानदार यांच्या संघटित विरोधामुळे शासनाने खुलीकरणाची प्रक्रिया थांबवली आहे, एवढेच नव्हे तर, काही प्रमाणात उलट्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे याबद्दल दुःख व्यक्त करते,

विदेशी चलनाच्या साठ्याची परिस्थिती काहीशी सुधारताच शासन पुन्हा एकवार, देशाच्या अधःपतनास कारण झालेल्या नियोजनाच्या व्यवस्थेकडे झुकत आहे याबद्दलही चिंता व्यक्त करते,

या गंभीर आणिबाणीच्या परिस्थितीतून सुटका परिस्थितीचे अचूक निदान आणि कठोर, त्वरीत व परिणामकारक उपाययोजना याशिवाय होणार नाही,

दुतोंडी राजकीय संधीसाधुपणाची भाषा, चालढकल यांमुळे सारा देश दीर्घ काळापर्यंत नेहरूव्यवस्थेच्या खोड्यात अडकून राहिला,

नेहरू व्यवस्थेच्या विषाचा देशावरील परिणाम थांबविणे आणि कमी करणे यासाठी निश्चित कार्यक्रम तातडीने आमलात आणणे आवश्यक आहे,

अशा परिस्थितीत देशी आणि विदेशी गुंतवणुकीस उत्तेजन देण्यासाठी खाजगी मालमत्तेचा हक्क पुनर्प्रस्थापित करणे, प्रशासकीय खर्चात काटछाट करणे, नेहरूव्यवस्थेतील कायदेकानू व नियम यांची दाटी संपवणे आणि उद्योजकांना उद्योग सुरू करण्याबरोबरच बंद करण्याचेही स्वातंत्र्य देणे, कार्यक्षमतेत अडथळा आणणारे कामगारविषयक कायदे व नियम दूर करणे यांकडे लक्ष दिल्यास भारतीय उद्योजक बाजारपेठेमध्ये ताकदीने उभे राहातील असा विश्वास व्यक्त करते;

आणि

स्वतंत्र भारत पक्षाने या दृष्टीने तयार केलेल्या तीस कलमी योजनेस पाठिंबा देते.

**ठराव ३ : खऱ्या स्वातंत्र्यासाठी दुसरे गणराज्य**

शेतकरी संघटनेचे नागपूर (११/१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन,

स्वातंत्र्यानंतरच्या नियोजनपद्धतीमुळे देश गरीबी, बेकारी, चलनवाढ, विषमता, कर्जबाजारीपणा यांनी पछाडला आहे; शासन भ्रष्टाचार, उधळपट्टी आणि अकार्यक्षमता यांनी खिळखिळे झाले आहे; अर्थसत्तेच्या हव्यासापोटी अनेक प्रकारे धर्म, जाती, प्रदेश, भाषा यांचे झगडे उभे राहात आहेत; कायदा आणि सुरक्षा व्यवस्था कोसळून पडली आहे; गुन्हेगारी व्यवस्थांनी शासनावर ताबा मिळविला आहे. स्वातंत्र्योत्तर धोरणांनी उद्‌भवलेल्या दारिद्र्य आणि बकालीपणामुळे, इतिहासजमा झालेल्या रोगराईंचा आणि साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होत आहे. देश अत्यंत बिकट अवस्थेत सापडला आहे, थोडक्यात, भारताच्या स्वातंत्र्योत्तर परिस्थितीबद्दल चर्चिलची अभद्र वाणी खरी ठरली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या, देशाच्या अधःपतनाचे कारण स्वराज्य आंदोलनाच्या ध्येयधोरणांशी प्रतारणा करून स्वीकारण्यात आलेली समाजवाद, नियोजन, शहरीकरण, औद्योगिकरण, सार्वजनिक क्षेत्राचे प्रभुत्व, बंदिस्त व्यापार यांवर आधारलेली नेहरूप्रणित अर्थव्यवस्था आहे; यामुळे स्वातंत्र्यानंतर देश वैभवाकडे जाण्याऐवजी मागे हटत गेला हे आता नेहरूंच्या वारसदारांनीही मान्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांची जाणीवपूर्वक लूट करण्यात आल्याचा कबुलीजबाबही शासनानेच गॅट कराराच्या संदर्भात दिला आहे. स्वातंत्र्यानंतर देशहिताला विघातक, स्वातंत्र्याच्या चळवळीच्या ध्येयधोरणांच्या विरोधी धोरणे

अधिवेशनाचा समारोप श्री. शरद जोशी यांनी खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी शेतकरी संघटनेने आखलेल्या पाच आघाड्यांवरील कार्यक्रमांची विश्लेषणासह घोषणा करून केला. भाषण सुरू होण्याआधी, उणे सबसिडीच्या मार्गाने लूट केल्यामुळे इंडिया सरकार प्रत्येक शेतकऱ्याला किती देणे लागते याबद्दल 'लेखाजोखा' प्रमाणपत्रांच्या वितरणाचे प्रतिक म्हणून अकोला जिल्ह्यातील श्री. गणपती बिल्लारी यादव या शेतकऱ्याला प्रमाणपत्र श्री. शरद जोशींच्या हस्ते देण्यात आले. इंडिया सरकार या शेतकऱ्याला गेल्या दहा वर्षांच्या लुटीपोटी २९ लाख ४७ हजार ४४७ रुपये देणे लागते हे ऐकल्याबरोबर तो जनसागर क्षणकाल अवाक होऊन निःस्तब्ध झाला आणि लगेच निषेधाच्या गर्जना करीत खळबळून जागा झाला. सर्वांत शेवटी लाखो माणसे शिस्तीने उभी राहिली, शिरस्त्याप्रमाणे त्यांनी शेतकरी संघटनेची शपथ घेतली व पुन्हा शिस्तीने खाली बसली. नंतर घोषणा होऊन अधिवेशनाची सांगता झाली आणि आजपर्यंत पिढ्यान्‌पिढ्या ऋणको म्हणून खालमानेने जगत आलेले हे शेतकरी स्त्रीपुरुष आपण 'धनको' असल्याचा साक्षात्कार होऊन, त्याच प्रतिष्ठेने वागण्याचा निर्धार करून आपापल्या गावी परतले.

## टाटा-बिर्ला

***'सरकारने लुटले नसते तर टाटा-बिर्ला म्हणून हिणवून घ्यावे लागले नसते, टाटा-बिर्लांसारखं मानाचं जगलो असतो.' नागपूर अधिवेशनात श्री. यादव यांना मिळालेल्या प्रमाणपत्रांवरील इंडिया सरकारकडून येणे रकमेचा आकडा ऐकून एका शेतकऱ्याची झालेली ही प्रतिक्रिया.***

## अंमलबजावणीसाठी कार्यकर्त्यांची बैठक

शेतकरी संघटनेचे नागपूर अधिवेशन १२ नोव्हेंबर १९९४ रोजी संपन्न झाले. अधिवेशनात घोषित झालेल्या कार्यक्रमांची

राबविण्यात आली. परिणामतः, अर्धशतकानंतरही हजारो स्वातंत्र्यसैनिकांचे आणि हुतात्म्यांचे स्वतंत्र भारताचे स्वप्न उध्वस्त झाले आहे.

पहिले भारतीय गणराज्य कोसळत आहे, एका नव्या गणराज्याची स्थापना झाल्याखेरीज गेल्या पन्नास वर्षांचा दुःखी कालखंड समाप्त होणार नाही याची विशेषत्वाने नोंद घेते आणि देशाच्या सध्याच्या परिस्थितीत केवळ स्वार्थापोटी, इतिहासाने देशविघातक ठरविलेल्या धोरणांचा पुरस्कार करणाऱ्या नोकरदार, राजकीय दलालखोर, काळाबाजारतस्करीखोर व सत्ताधाऱ्यांच्या कृपादृष्टीतील उद्योजक यांच्या नेहरूव्यवस्था परत आणण्याच्या प्रयत्नांचा सर्व शक्तीने प्रतिकार करण्याचा निर्धार व्यक्त करते.

मंदिर, मंडल या प्रश्नांवर देशात विवाद उभे करणाऱ्या ताकदी देशद्रोही असल्याचे जाहिर करते, आणि दुसऱ्या गणराज्याच्या उभारणीसाठी स्वतंत्र भारत पक्षाने मांडलेल्या उद्दिष्टांना आणि तत्त्वांना पाठिंबा दर्शविते; आणि

पहिले गणराज्य वैध मार्गांनी संपुष्टात यावे व दुसरे गणराज्य लवकरात लवकर उभे राहावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा निर्धार जाहिर करते.

शेतकरी महिला आघाडी

# चौथे अधिवेशन
## नागपूर
## ११, १२ नोव्हेंबर १९९४

## ठराव

**ठराव १ : महाराष्ट्र शासनाचे दळभद्री महिला धोरण**

महाराष्ट्र शासनाने २२ जून १९९४ रोजी जाहिर केलेल्या महिला धोरणाचा शेतकरी महिला आघाडीच्या समितीने अभ्यास करून सादर केलेला अहवाल 'महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण : दळभद्री चिंधी'

शेतकरी महिला आघाडीचे नागपूर (१२ नोव्हेंबर १९९४) रोजी भरलेले हे अधिवेशन सर्वांशाने स्वीकृत करते;

महाराष्ट्र शासनाच्या या महिला धोरणात समाजातील बहुसंख्य ग्रामीण स्त्रीसमाजाच्या पाणी, जळण, शिक्षण, आरोग्यसुविधा यांसारख्या प्राथमिक समस्यांचासुद्धा उल्लेख नाही; तरीही बढाई मारण्यासारखा इतर कोणताही मुद्दा हाती न उरलेले महाराष्ट्र शासन आपण महाराष्ट्रातील स्त्रियांचे कल्याण या धोरणाने करीत आहोत अशी शेखी मिरवून आगामी निवडणुकांसाठी महिलांची मतपेढी तयार करण्याचा खटाटोप करीत आहे याबद्दल हे अधिवेशन शासनाची कीव करते आणि आपल्या फसव्या प्रचाराला बळी पडतील असा समज करून आम्हा महिलांना निर्बुद्ध मानते याबद्दल शासनाचा धिक्कार करते.

सर्व क्षेत्रांत विश्वसनीयता गमावलेल्या शासनाने महिलांच्या उद्धारासाठी म्हणून हे महिला धोरण आखून सत्तेमुळे हाती आलेल्या साधनांचा आणि प्रसारमाध्यमांचा मनमानी वापर करून त्याच्या प्रचाराचा धूमधडाका उडवून आता कुठे धीट बनू लागलेल्या आणि योग्य मार्गावर आलेल्या स्त्रीचळवळीला सरकारी गोठ्यात बांधण्याचा डाव रचला आहे त्याबद्दल शासनाचा हे अधिवेशन निषेध करते आणि या धोरणाच्या निमित्ताने शासनाने चालविलेल्या ढोंगीपणाचे खरे स्वरूप लोकांसमोर उघड करण्याचा निर्धार करते; तसेच, महाराष्ट्र शासनाच्या या ढोंगीपणात सामील झालेल्या, विशेषतः भगिनींना आवाहन करते की त्यांनी शासनाची साथ सोडून द्यावी आणि स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक शासकीय धोरणातून नव्हे तर कार्यातूनच होऊ शकेल हे ध्यानात घेऊन स्त्रीचळवळ बळकट करण्यासाठी आपल्या बुद्धीचे व क्षमतेचे योगदान द्यावे.

**ठराव २ : दारू दुकान बंदी आंदोलन**

शेतकरी महिला आघाडी शेतकरी संघटनेच्या सहकार्याने गावागावातील दारू दुकाने बंद

अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक नागपूर पासून ७० कि. मी. अंतरावरील तोतलाडोह (ता. रामटेक) येथील विश्रामगृहात १४ व १५ नोव्हेंबर रोजी पार पडली.

दोन दिवस चाललेल्या या प्रदीर्घ बैठकीत १ डिसेंबरचे रास्ता रोको, कापूस, ऊस यांची खुली विक्री, कर्जमुक्ती – लूटवापसी, दारूदुकानबंदी, नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या प्रतिमा, फोटो, तसबिरी काढून ठेवणे आणि येत्या विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्षाला पाठिंबा म्हणजे कर्जमुक्तीला मतदान या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. हे सर्वच कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जाणे येत्या निवडणुकीच्या दृष्टीने आवश्यक असल्याची भूमिका सर्वांना मान्य झाली आणि त्याप्रमाणे आपापल्या जिल्ह्यात ते राबविण्यासाठी आखणी करण्याचे कार्यकर्त्यांनी ठरविले.

**लेखाजोखा**

अधिवेशन काळापर्यंत 'कर्जाचा लेखाजोखा' विनाशुल्क देण्याचे ठरले होते. तरीही ज्या शेतकऱ्यांनी कर्जाचा लेखाजोखा भरतांना अधिवेशन निधी देऊन अधिवेशनास आर्थिक हातभार लावला त्यांना या बैठकीने धन्यवाद दिले. १२ डिसेंबरपासून नव्या स्वरूपातील 'लेखाजोखा' शेतकऱ्याकडून भरून घेण्यास सुरुवात करण्यात येणार आहेत. त्यामुळे अधिवेशनाच्या आधी ज्यांना हे फॉर्म भरणे जमले नाही. त्यांना ते भरून आपले लेखाजोखा प्रमाणपत्र मिळविता येईल. मात्र, त्यासाठी त्यांना प्रत्येकी वीस रुपये निधी हे प्रमाणपत्र तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चापोटी भरावे लागतील.

**निवडणूक**

विधानसभेच्या येत्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेवर चर्चा होऊन महाराष्ट्रात सर्वच्या सर्व जागा लढवू इच्छिणाऱ्या 'स्वतंत्र भारत' पक्षाला या निवडणुकीत सर्व शक्तीने पाठिंबा देण्याचे ठरविण्यात आले. निवडणुकीसाठी आपापल्या भागातील प्रतिष्ठाप्राप्त मान्यवर

करण्याचे आंदोलन गेली पाच वर्षे सातत्याने करीत आहे. दारूमुळे कौटुंबिक जीवनाचे नुकसान तर होतेच पण दारू-दुकानांमुळे गुंड प्रवृत्तीची जोपासना होऊन समाजाचे स्वास्थही पार ढासळून गेले आहे. या वस्तुस्थितीमुळे शेतकरी महिला आघाडीच्या या आंदोलनास गावोगाव स्त्रीपुरुषांनी मोठ्या प्रमाणात सक्रीय पाठिंबा दिला. पण शासनाने मात्र आपल्या पोलिसांकरवी दारू दुकानांना संरक्षण देऊन हे आंदोलन यशस्वी होऊ न देण्याच्या कारवाया केल्या याबद्दल शेतकरी महिला आघाडीचे नागपूर (१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन खंत व्यक्त करते.

कोणत्याही परिस्थितीचा आपल्या राजकीय स्वार्थासाठी वापर करण्याचे व्यसन लागलेल्या विद्यमान महाराष्ट्र शासनाने शेतकरी महिला आघाडीचे दारू दुकान बंदीचे आंदोलन पोलिसी बळाने मोडून काढण्याची आपली कारवाई चालू ठेवत असतांनाच ग्रामसभांनी दारू दुकान बंदीची मागणी केल्यास ते बंद केले जाईल असे आश्वासन नुसते सभेतूनच नव्हे तर ते सध्या गाजवत असलेल्या आपल्या महिला धोरणाच्या कलमातून देऊन लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न चालविला आहे याबद्दल हे अधिवेशन तीव्र संताप व्यक्त करते.

मागणी झाल्यास दारूदुकान बंदीचे आश्वासन पण दारू दुकाने बंद करणाऱ्या स्त्री-पुरूषांना पोलिसगुंडांकडून मारहाण व अटका याने या विषयी शासनाचा दुटप्पीपणा सिद्ध झाला आहे याची नोंद घेऊन हे अधिवेशन दारू दुकान बंदीचे आंदोलन अधिक तीव्रतेने आणि आक्रमकतेने पुढे चालविण्याचा निर्धार करते आणि समाजातील सर्व सभ्य घटकांनी भय व उदासीनता झटकून या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन करते.

**ठराव ३ : आर्थिक आघाडीवर सहभाग**

शेतकरी महिला आघाडीने खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत केले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ शेतकऱ्यांना पर्यायाने ग्रामीण जनतेलाही मिळावा या दृष्टीने शासन या व्यवस्थेची अंमलबजावणी करीत नाही याबद्दल शेतकरी महिला आघाडीचे नागपूर (१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन निषेध व्यक्त करते आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी शेतकरी संघटना जे जे कार्यक्रम हाती घेईल त्यात सर्व शक्तीने सहभाग घेण्याचा हे अधिवेशन निर्णय घेते.

खुल्या अर्थव्यवस्थेच्या या संक्रमण काळात ग्रामीण महिलांना समाजाचा उत्पादक व उद्योजक घटक म्हणून पुढे येण्याची संधी व प्रोत्साहन देण्याचे कार्यक्रम करण्याचा हे अधिवेशन निर्धार जाहिर करते.

**ठराव ४ : कर्जमुक्ती आंदोलन**

शासनाने आपण शेतकऱ्यांवर उणे सबसिडी लादल्याचा कबुली जबाब दिला आहे त्या अनुषंगाने, शेतकरी कर्जबाजारी नसून शासनच शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात देणे लागते या शेतकरी संघटनेच्या भूमिकेचे शेतकरी महिला आघाडीचे नागपूर (१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन स्वागत करते आणि या भूमिकेतून कर्जवसुलीच्या विरोधात उभ्या राहाणाऱ्या आंदोलनात शेतकरी महिला आघाडी आपल्या सर्व ताकदीने सहभागी होईल असा ठराव हे अधिवेशन करते.

**ठराव ५ : लक्ष्मीमुक्ती**

नुसते कायदे करून कोणताही अधिकार मिळत नाही हे गेल्या पन्नास वर्षांत सिद्ध झाले आहे. उलट गेल्या चार वर्षांत शेतकरी महिला आघाडी व शेतकरी संघटनेच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमातून महाराष्ट्रातील लाखो महिलांना संपत्ती अधिकार मिळाला आहे. शेतकरी महिला आघाडीचे नागपूर (१२ नोव्हेंबर १९९४) येथे भरलेले हे अधिवेशन शेतकरी महिलांना संपत्तीअधिकाराचा सन्मान देणारा व त्यांच्यामध्ये स्व-अस्तित्वाची, स्वाभिमानाची व स्वशक्तीची जाण निर्माण करणारा तसेच पुरुषांच्या मनातही स्त्रीसन्मानाची जाण निर्माण करणारा हा लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम अधिक व्यापक प्रमाणात हाती घेण्याचा निर्णय करते.

● ● ●

नागरिकांना देशाचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी 'फक्त एकदाच' का होईना या पक्षासोबत येण्याचे आवाहन करण्याचे ठरविण्यात आले. शेतकरी संघटनेच्या इच्छुक कार्यकर्त्यांनाही आपले नाव सुचविण्याची मुभा देण्यात आली. मात्र, स्वतंत्र भारत व शेतकरी संघटनेची राजकीय समिती ठरवेल तो उमेदवार मान्य करून त्याला विजयी करण्याच्या दृष्टीने सर्व शक्ती पणाला लावण्याचे ठरविण्यात आले.

या संदर्भातील साहित्य, सूचना इत्यादींच्या जलद वितरणासाठी मनमाड व पुणे येथे संपर्क कार्यालये सुरू करण्याचे ठरले.

**मनमाड :**
श्री. देवाजी शेळके,
आनंद दूध डेअरी, शनीमंदिराजवळ,
आठवडे बाजार, मनमाड.
फोन : ०२५५२-३२६१ (कार्यालय)
०२५५२-८३४३५ (निवास)

**पुणे :**
श्री. नाना आठवले
न्यू सुप्रीम कॅलेंडर्स,
७५३, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन : ०२१२-४७३७७७

**ऊस :** लेव्ही साखरेच्या किंमतीतील कपात रद्द करणे, मळीवरील वाहतूक बंदी उठविणे आणि उसाला ११ टक्के उताऱ्यास किमान १००० रु. टन भाव या ऊस आंदोलनाच्या प्रमुख मागण्या राहतील असे ठरले.

**कापूस :** रॅलीज काढून परप्रांतात कापूस विकावा असे ठरविण्यात आले. २३ नोव्हेंबर १९९४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच दिवशी कापूस रॅलीने लगतच्या राज्यांत नेऊन वातावरण निर्मिती करण्याचे ठरले.

### महिला अधिवेशने

७ डिसेंबर १९९४ ते १ जानेवारी १९९५ या काळात जिल्हा महिला अधिवेशने भरवून त्यांत माजघर शेतीच्या प्रकल्पांसंबंधी चर्चा मार्गदर्शन तसेच शासनाच्या महिला धोरणावर व महिलांच्या प्रश्नावर चर्चा करण्याचे ठरले.

**(नागपूर अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत व श्री. शरद जोशींचे भाषण पुढील अंकात)**

# शेतकऱ्यांचे आव्हान

**अग्रलेख, दैनिक लोकसत्ता, १४ नोव्हेंबर १९९४**

मतपेटी आणि लोकलढा ही दोन शस्त्रे हाती घेऊन ग्रामीण जनतेचे प्रश्न सोडविण्याचा शेतकरी संघटनेचा निर्धार जेवढा नवीन तेवढाच नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवर भरलेल्या ज्या विराट मेळाव्यात तो जाहिर झाला तो मेळावाही अभूतपूर्व असाच होता. महापुराचा लोंढा यावा तसाच शेतकरी स्त्री-पुरूषांचा प्रचंड समुदाय शनिवारी सायंकाळी झालेल्या या मेळाव्याला लोटला. मेळावा सुरू असतानाही लोंढ्या-लोढ्यांनी आणि लाटा-लाटांनी शेतकरी येतच राहिले. परिणामी नागपूरचे ते ऐतिहासिक आणि विस्तीर्ण मैदान खांद्यावर शिदोऱ्यांची आणि कपड्यांची बोचकी घेऊन आलेल्या स्त्री-पुरूष शेतकऱ्यांनी फुलून गेले.

काँग्रेस किंवा भाजप-शिवसेना युती यांच्या राष्ट्रीय व राज्य पातळीवरील पुढाऱ्यांच्या मेळाव्यांनी नम्र होऊन जावे असा अतिविराट मेळावा शेतकरी संघटनेला भरविता आला. ही संघटना संपली किंवा तिचे प्रणेते शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले, असा प्रचार करणाऱ्या सर्व राजकीय हितसंबंधांना भयभीत करणारे उत्तर देऊ शकेल असे त्या मेळाव्याचे विशाल स्वरूप होते. या मेळाव्याला आलेल्या सुमारे दोन हजार वाहनांनी शेतकरी संघटनेचा भक्कमपणा केवळ संख्याबळावरच सिद्ध होणारा नाही तर तिची आर्थिक बाजूही मजबूत आहे हे सांगणारा होता. काँग्रेस आणि भाजप-शिवसेना युती यांच्यासह राज्यातील सर्व राजकीय आघाड्यांना अंतर्मुख व्हायला लावणारी आणि त्यांच्या नुसत्याच राजकीय भूमिकांना छेद देणारी एक भरीव राजकीय संघटना राज्यात उदयाला येत आहे, या गोष्टीचा गंभीरपणे विचार करायला त्यांना भाग पाडणाऱ्या या मेळाव्याचे स्वरूप होते. असा भव्य मेळावा भरविणाऱ्या व अखेरपर्यंत त्याचे स्वरूप शिस्तबद्ध राखणाऱ्या आयोजकांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे. राजकीय मेळावे आणि नागपूर शहर यांच्या नात्याचा इतिहास फारसा कौतुकास्पद नाही, ही गोष्ट लक्षात घेतली तर शेतकऱ्यांच्या मेळाव्याचे हे यशही वाखाणण्याजोगे होऊन जाते. मात्र विराटपणा आणि शिस्त एवढ्यावरच या मेळाव्याचे यश मर्यादित नाही. शेतकरी संघटनेचा राजकीय पवित्रा इतर सर्व राजकीय पक्षाहून वेगळा आहे व त्यांना छेद देणारा आहे, ही गोष्ट उपस्थितांएवढीच निरीक्षकांच्या आणि मित्रांएवढीच प्रतिस्पर्ध्यांच्या नजरेत ठसवून देण्यातही हा मेळावा यशस्वी झाला आहे. समाजवाद व नेहरूनीतीला संपूर्ण विरोध, खुल्या अर्थव्यवस्थेचा मुक्त पुरस्कार आणि जातीधर्माच्या संकुचित भूमिकांत अडकलेल्या सध्याच्या राजकारणावर कठोर प्रहार, या आपल्या भूमिका शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाने अत्यंत प्रखरपणे आणि प्रसंगी अनेकांची नाराजी ओढवून या मेळाव्यात मांडल्या. या सर्वच प्रश्नांवर अन्य राजकीय पक्षांच्या भूमिकांचे आजचे संदिग्ध धोरण आणि त्यांची तेवढीच धूसर मांडणी लक्षात घेता शेतकरी संघटनेचे वेगळेपण ठसठशीतपणे नजरेत भरावे असे आहे.

नागपूरच्या मेळाव्याने कांद्यावरील निर्यातबंदीचा निषेध करणे, उसाचे भाव पाडण्याच्या राजकारणाला विरोध करणे, कापूस एकाधिकार नाकारून हवा तेथे आपला कापूस नेऊन विकण्याचा शेतकऱ्यांना अधिकार आहे हे पुन्हा एकवार सांगणे या गोष्टी शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे या शेतकरी संघटनेच्या आजवरच्या मुख्य कलमी कार्यक्रमाशी सुसंगतच आहेत. पण पडीत जमिनीबाबत महाराष्ट्र सरकारच्या धोरणाला संघटनेने केलेला विरोध त्याहून वेगळा आणि अधिक गंभीरपणे समजावून घेण्याची गरज आहे. महाराष्ट्रात लक्षावधी एकर मशागतीयोग्य जमीन पडीत राहिली, याचे कारण शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात आणि हलाखीत शोधावे लागणार आहे. या दारिद्र्य व हलाखीचा संबंध त्यांच्यावर सरकारने लादलेल्या उणे-सबसिडीच्या धोरणाशी आहे. उणे-सब्सिडीच्या सध्याच्या धोरणामुळे

शेतकरी कायमचा कर्जबाजारी राहिला आहे. आणि कर्जात बुडून गेलेला शेतकरी ताब्यात असलेल्या जमिनीलाच न्याय देऊ शकणार नाही हे उघड आहे. राज्यातील शेतीयोग्य जमीन पडीत राहते याचे कारण शेतकऱ्यांवर सरकारने लादलेल्या या हलाखीत शोधले पाहिजे हे नागपूर मेळाव्याचे आवाहन कृषि क्षेत्राशी संबंधित विचारवंतांना आणि कार्यकर्त्यांना विचारप्रवृत्त करणारे आहे. शेतकऱ्यांना दरिद्री ठेवून जमिनी पडीत राहतील अशी व्यवस्था करायची आणि जमिनी पडीत राहिल्या म्हणून त्यांचे वाटप राजकीय सोयीसाठी करण्याचा पवित्रा घ्यायचा हा सरकारी प्रकार या मेळाव्याने त्याच्या खऱ्या स्वरूपांत लोकांसमोर आणला आहे. शेतकरी कायमचे कर्जदार राहतील हा उणे सबसिडीचा परिणाम ही केंद्र व राज्य सरकारच्या उफराट्या नियोजनाची परिणती आहे व या नियोजन पद्धतीला सक्रीय विरोध करण्याची गरज या मेळाव्याने प्रतिपादन केली आहे. उणे सबसिडीचा हिशोब केल्यास शेतकरी कर्जदार रहात नसून सरकारच शेतकऱ्यांचे कर्जदार आहे हे सिद्ध होते, असे सांगणाऱ्या या मेळाव्याने 'कर्जमुक्ती नव्हे लूटमुक्ती' असा नवा नारा आता दिला आहे. शिवाय कर्जवसुलीच्या नावावर आजवर झालेली अशी 'लूट' परत मिळविण्याचे 'लूटवापसीचे' आंदोलन करण्याचा निर्धार त्याने जाहिर केला आहे. साऱ्यांत महत्त्वाची बाब ही की अडाणी, अर्धशिक्षित म्हणून हिणविल्या जाणाऱ्या ग्रामीण शेतकरी स्त्री-पुरूषांना जाती धर्माच्या भाषेपेक्षा आर्थिक प्रश्नांची भाषा अधिक आपली वाटते, हे सिद्ध करणे हे या मेळाव्याचे सर्वात मोठे यश आहे.

जाती-धर्माची भाषा आणि त्यांचेच संकुचित राजकारण शहरी सुशिक्षितांना मुक्त अर्थव्यवस्था, डंकेल प्रस्ताव, बहुराष्ट्रीय कंपन्यांची स्पर्धा अशा भाषेत बोलणारा आपला तथाकथित गावंढळ शेतकरी बरेच काही शिकवू शकणार आहे, हे दाखवून देणे हेही या मेळाव्याचे नेत्रदीपक यश आहे.

आपल्या प्रश्नांसाठी शेतकरी संघटना येत्या निवडणुकीत सर्व शक्तिनिशी उतरणार असल्याचे नागपूरच्या मेळाव्याने जाहिर केले. स्वतंत्र भारत पक्षाच्या झेंड्याखाली येत्या निवडणुका लढविण्याची व तीत शेतकरी कार्यकर्त्यांसोबत समविचारी लोकांना राजकारणाच्या मैदानात उतरविण्याची आपली तयारी संघटनेने जाहिर केली आहे. आपण निवडणुकांचे राजकारण करणार नाही, ही एकेकाळची संघटनेची भाषा आता मागे पडली आहे. 'न धरी शस्त्र करी' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्रीकृष्णाला परिस्थितीवशात् आपली प्रतिज्ञा बाजूला सारून शस्त्र हाती घ्यावे लागल्याचा दृष्टांत श्री. शरद जोशी यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन करताना या मेळाव्यात दिला. उपजीविकेचे प्रश्न मागे पडण्याचा आणि जाती-धर्माच्या प्रश्नांचे रण माजण्याच्या आजच्या काळात समाजासमोरील खऱ्या प्रश्नांसाठी एखाद्या नेत्याने वा संघटनेने आपला शब्द फिरविला एवढ्याचसाठी त्याला अनैतिक वगैरे म्हणणे फारसे गंभीरपणे घेण्याचे कारण नाही. त्यातही धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यांच्या खोट्या शपथा घेणाऱ्यांनी तशा नीतीमत्तेचा आव आणण्यातही तथ्य नाही. शेतकरी वर्गाचे प्रश्न सोडवायचे तर निवडणुकांच्या क्षेत्रात उतरावे लागणे भाग आहे. त्या क्षेत्रात उतरण्याएवढे बळ संघटनेने आता प्राप्त केले आहे. तरीही शेतमालाला रास्त दाम मिळविण्यासाठी शेतकरी संघटनेसोबत येणारा शेतकऱ्यांचा वर्ग निवडणुकांच्या राजकारणात संघटनेबरोबर किती प्रमाणात येईल, हा प्रश्न शिल्लक राहणारा आहे. निवडणुकीच्या राजकारणातील मतदारांच्या बांधिलकीचे निकष हे नेहमीच वेगळे राहिले आहेत. शिवाय ते नेहमीच फारसे आदरणीय राहिले असल्याचा आजवरचा इतिहास नाही. त्यामुळे शेतकरी वर्गाचा सध्याचा प्रचंड पाठिंबा निवडणुकीतील मतदानात रूपांतरित करण्यात शेतकरी संघटना आणि तिने स्थापन केलेला स्वतंत्र भारत पक्ष कितपत आणि कसा यशस्वी होतो ते पाहणे राजकीय अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल. नागपूर मेळाव्यात सहभागी झालेल्या शेतकरी वर्गाचा उत्साह संघटनेच्या कार्यकर्त्यांचा व नेतृत्वाचा या संदर्भातील आत्मविश्वास वाढविणारा असला तरी नुसता उत्साह पुरेसा नाही, ही गोष्ट श्री. शरद जोशी व त्यांचे सहकारी जाणत असणारच. त्यामुळे या पुढल्या काळातील त्यांच्या हालचाली व राजकीय डावपेच महत्त्वाचे ठरणार आहेत. समाजवादाची शपथ घ्यायला नकार देण्याचा आणि त्यासाठी आवश्यक तर लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्याला न्यायालयात आव्हान देण्याचा संघटनेचा बाजूने मतांचे गठ्ठे वळवायला कितपत उपयोगी ठरेल, या प्रश्नाचे उत्तर आजच देणे अवघड आहे. समाजवादाची शपथ न घेणाऱ्या उमेदवारांना किंवा पक्षांना निवडणूक चिन्ह न देण्याचा निर्वाचन आयोगाचा निर्णय शेतकरी संघटनेला आपले उमेदवार अपक्ष म्हणून उभे करण्यास भाग पाडणारा आहे. तसे झाल्यास निवडणुकीची एकसंध उभारणी हे संघटनेपुढील आणखी एक आव्हान ठरणार आहे. शेतकरी संघटनेचे प्रणेते श्री. शरद जोशी यांची लोकशिक्षक म्हणून असणारी योग्यता मोठी आहे. डंकेल आणि खुली अर्थव्यवस्था असे विषय ग्रामीण महिलांच्या मेळाव्यातही सोपे करून समजावून देण्याचे कसब त्यांच्यात आहे. तरीही निवडणुकांच्या राजकारणाचे आव्हान फार मोठे आहे. आजवरच्या सर्व आव्हानांना आणि आरोपांना लीलया तोंड देणारा शेतकऱ्यांचा हा नेता हे नवे आणि अवजड आव्हान कसे पेलतो ते पाहणे, हाही एक मोठा अनुभव ठरणार आहे.

*(साभार)*

## लेखा जोगा

१. नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने वितरित केलेले लेखाजोखा फॉर्म २५ नोव्हेंबर १९९४ पर्यंत अधिवेशनाच्या सर्व प्रकारच्या निधीच्या हिशेबासह नागपूर जिल्हा शेतकरी संघटना कार्यालयाकडे सादर करावयाचा आहे. संपूर्ण हिशोब सादर करणाऱ्या जिल्ह्यांचीच प्रमाणपत्रे १२ डिसेंबर १९९४ पर्यंत जिल्हाप्रमुखांमार्फत पाठविण्यात येतील.

२. माहिती भरलेले लेखाजोखा फॉर्म फक्त जिल्हाप्रमुखांकडेच पाठवावे. मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवू नयेत.

## इंडिया शासनाच्या हस्तकांना धनको शेतकऱ्यांचा हिसका

गेली चाळीस वर्षे सातत्याने उणे सबसिडी लादून इंडिया शासनाने शेतकऱ्यांची लूट केली. त्यामुळे शेतकरी कर्जदार नसून तो धनको आहे आणि इंडिया शासनच कर्जदार आहे याचा साक्षात्कार घेऊन नागपूर अधिवेशनातून परतलेल्या शेतकऱ्यांपैकी नांदेड जिल्ह्याच्या भोकर तालुक्यातील शेतकऱ्यांनी कर्जवसुली अधिकाऱ्यांना चांगलाच हिसका दाखविला.

नागपूर अधिवेशनातून परतल्या परतल्या भोकर तालुक्यातील कळगाव येथील शेतकऱ्यांना समजले की भूविकास बँकेचे अधिकारी कर्जवसुलीचा कार्यक्रम सुरू करणार आहेत. शेतकऱ्यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले की सरकारनेच कबुली दिल्याप्रमाणे सरकारच शेतकऱ्यांचे प्रचंड देणे लागले. त्यामुळे तुम्ही का कर्जवसुलीचा कार्यक्रम करू नका. पण त्यांनी ऐकले नाही. १८ नोव्हेंबर १९९४ रोजी बँकेची जीप दोन पोलिस घेऊन कळगाव येथील श्री. चव्हाण या शेतकऱ्याच्या घरी वसुलीसाठी आली. वसुलीस नकार दिल्याने बँकेचे कर्मचारी श्री. चव्हाण यांच्या घरावर चढून त्यांनी घरावरील पत्रे जप्तीच्या नावाने काढावयास सुरुवात केली. दरम्यान, गावात सगळीकडे बातमी पोहोचली होती. त्यामुळे गावातील सर्व गावकरी चव्हाण यांच्या घरासमोर जमा झाले. त्यांनी दोनही पोलिसांना बाजूला बसवून बँकेच्या तीन अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासले व त्यांच्या गळ्यात फाटक्या चपलांच्या माळा घालून त्यांची गाढवांवरून धिंड काढली. ही धिंड गावभर मिरवून झाल्यानंतर शेजारील हाडोळी व कामनगाव या गावांतूनही मिरविण्यात आली. या कार्यक्रमात कळगावच नव्हे तर कामनगावातील शेतकऱ्यांनीही जबाबदारीने भाग घेतला.

नांदेड जिल्ह्यात सातशेहून अधिक गावे बळीराज्य गावे झाली असून ती कळगाव, कामनगार प्रमाणे आपल्या संरक्षणास सज्ज आहेत.

*(प्रेषक : श्री. बाबासाहेब देशमुख, नांदेड)*

## शेतकरी महिला आघाडी - जिल्हा अधिवेशने श्री. शरद जोशी यांचा दौरा

| | |
|---|---|
| ७ डिसेंबर १९९४ | नागपूर |
| ८ डिसेंबर १९९४ | भंडारा |
| ९ डिसेंबर १९९४ | गडचिरोली |
| १० डिसेंबर १९९४ | चंद्रपूर |
| ११ डिसेंबर १९९४ | वर्धा |
| १२ डिसेंबर १९९४ | यवतमाळ |
| १३ डिसेंबर १९९४ | अमरावती |
| १४ डिसेंबर १९९४ | अकोला |
| १५ डिसेंबर १९९४ | बुलढाणा |
| १६ डिसेंबर १९९४ | जालना |
| १७ डिसेंबर १९९४ | परभणी |
| १८ डिसेंबर १९९४ | नांदेड |
| १९ डिसेंबर १९९४ | लातूर |
| २० डिसेंबर १९९४ | बीड |
| २१ डिसेंबर १९९४ | उस्मानाबाद |
| २२ डिसेंबर १९९४ | सोलापूर |
| २३ डिसेंबर १९९४ | सांगली |
| २४ डिसेंबर १९९४ | कोल्हापूर |
| २५ डिसेंबर १९९४ | सातारा |
| २६-२७ डिसेंबर १९९४ | विश्रांती |
| २८ डिसेंबर १९९४ | अहमदनगर |
| २९ डिसेंबर १९९४ | औरंगाबाद |
| ३० डिसेंबर १९९४ | जळगाव |
| ३१ डिसेंबर १९९४ | धुळे |
| १ जानेवारी १९९५ | नाशिक |

या दौऱ्यात प्रत्येक जिल्ह्यात महिला अधिवेशने आयोजित केली असून त्यांत महिला प्रश्न, शासनाचे महिला धोरण, माजघर शेती व त्या संदर्भात 'शिवार'चे व्यापार शेतीच्या भूमिकेतून स्थान इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात येईल. तसेच शेतकरी संघटनेच्या 'स्वतंत्र भारत' पक्षासंबंधीच्या भूमिकेचे विश्लेषण करण्यासाठी सायंकाळी किंवा रात्री एक जाहिर सभा आयोजित करण्यात येईल.

या संपूर्ण दौऱ्यात शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सरोज काशीकर व स्वतंत्र भारत पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे निमंत्रक ॲड. मोरेश्वर टेमुर्डे हे दोघे सहभागी होणार आहेत. ज्या जिल्ह्यांत आवश्यकता भासेल तेथे शेतकरी संघटनेच्या जिल्हा कार्यकर्त्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत.

●

## छापता छापता

### म. गांधी मार्केट

नागपूरच्या कमलाना मार्केटला पंडित जवाहरलाल नेहरूंचे नाव देण्याचा सरकारी कार्यक्रम २१ नोव्हेंबरला ठरला होता. त्या आधीच, १९ नोव्हेंबर रोजी शेतकरी संघटनेच्या नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी त्या मार्केटवर महात्मा गांधीजींची प्रतिमा लावून त्याचे 'म. गांधी मार्केट' असे नामकरण केले. या प्रकरणी विभागप्रमुख श्री. राम नेवले यांना अटक केल्याचे समजते.

### इंदिराजींचा पुतळा उखडला?

नेहरूनीतीलमुळेच आपली धूळधाण झाली याची पक्की खात्री नागपूर अधिवेशनात पटलेल्या अमरावती जिल्ह्यातील 'धनको' शेतकऱ्यांनी इंदिरा गांधींचा एक पुतळा उखडून टाकल्याची वार्ता आली आहे. या घटनेचा पूर्ण तपशील हाती आलेला नाही.

## नवीन पुस्तके उपलब्ध

१. शेतकरी संघटना : राजकीय भूमिका – अजित नरदे – मूल्य रु. १०
२. * महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण : दळभद्री चिंधी – शेकरी महिला आघाडी – मूल्य रु. १०
३. शेतकरी संघटना राजकीय भूमिकेचे दशक – शेतकरी संघटना विशेषांक – मूल्य रु. १५

शेतकरी संघटना, मध्यवर्ती कार्यालय, अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१) ता. खेड, जि. पुणे.
या पत्त्यावर म. ऑ. केल्यास मिळू शकतील. रुपये दहा अधिक पाठविल्यास रजिस्टर्ड पोष्टाने पाठविण्यात येतील.

** नागपूर तरुण भारत या दैनिकाने संपादकीयातून या पुस्तिकेची प्रशंसा केली आहे.*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On November 23, 1994

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 21, 1994

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# १ डिसेंबर १९९४ – महाराष्ट्रभर रास्ता रोको

## नागपूर अधिवेशनाचे आदेश

१. **नेहरूनीतीचा त्याग :-**

शेतकऱ्यांना आणि पर्यायाने देशाला आजच्या अधोगतीच्या नीचतम पातळीवर आणण्यास कारणीभूत झालेल्या नेहरूनीतीला झिडकारून देण्याची खूण म्हणून

अ) आपापल्या घरातील पं. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांचे फोटो, तसबिरी काढून गुंडाळून ठेवावे.

ब) गावातील सार्वजनिक ठिकाणे, संस्था येथे या नेत्यांचे फोटो, पुतळे इत्यादि असल्यास त्या संस्थांचा ठराव करवून ते उतरवून ठेवावे.

क) नेहरूनीतीवर चाललेल्या इंडिया शासनाने शेतकऱ्यांची प्रचंड लूट केली आहे, त्या शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेता या नेत्यांची नवीन स्मारके उभारण्याचे काम शासनाने किंवा संस्थांनी काढू नये असे संबंधितांना निक्षून सांगणे.

२. **एक डिसेंबरला रास्ता रोको**

गॅट करार स्वीकृत करूनसुद्धा राज्य व केंद्र शासन कांदा निर्यात बंदी, कापूस निर्यात बंदी, साखरेची आयात करून उसाचे भाव पाडणे, शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेणे अशासारखी त्या कराराचा भंग करणारी धोरणे अंमलात आणीत आहे. सरकारच्या या वृत्तीचा विरोध करण्यासाठी १ डिसेंबर १९९४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रास्ता रोको आंदोलन. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यासंबंधीची आपली घोषणा मागे घेतली नाही तर त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर अनिश्चितकालीन रेल व रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.

३. **खुला व्यापार :**

अ) शेतकऱ्यांनी आपला कापूस शासनाची कापूस एकाधिकार खरेदी झुगारून कोठेही विकावा.

ब) ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या मर्जीला येईल त्या कारखान्याला ऊस घालावा किंवा स्वतःचे गुऱ्हाळ करावे, वेळ पडली तर जाळून टाकावा, पण सरकारी दडपणाखाली ऊस विकू नये.

४. **कर्जमुक्ती कसली – लूटवापसी**

सरकारने गॅट करारासंबंधात गॅटच्या सचिवालयाकडे दिलेल्या उणे सबसिडीच्या कबुलीजबाबप्रमाणे सरकार प्रत्येक उत्पादक शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे देणे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांवर कसले कर्जच नाही, तर मुक्ती कशापासून? त्यामुळे यापुढे हे आंदोलन 'लूटवापसी' या नावाने चालणार. त्यामुळे यापुढे कोणीही सरकारी किंवा बँका सोसायट्यांचे अधिकारी कर्जवसुलीच्या कारवाईसाठी आले तर त्यांच्या तोंडाला काळे फासा, चोरदरोडेखोरांना आपण जसे वागवतो तसे त्यांना वागवा.

गावात पुढारी - सत्तारूढ आणि विरोधीही – आल्यास त्यांना उणे सबसिडीच्या संदर्भात प्रश्न विचारून त्यावर बोलण्यास भाग पाडा.

५) **कर्जमुक्तीला मतदान करा :**

काँग्रेस सरकारने गॅट कराराला आणि खुल्या व्यवस्थेला दिलेली मान्यता तोंडदेखली आहे. विरोधी पक्ष तर उघड उघड या दोहोंच्या विरोधात आहेत. समाजवादरहित खुल्या व्यवस्थेचा पुरस्कार करणारा 'स्वतंत्र भारत पक्ष' येत्या निवडणुकीत उतरत आहे. उद्योजक घटकांवर निर्बंध न लादणारे शासन देण्याचे या पक्षाचे उद्दिष्ट आहे. येत्या निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्षाच्या रूपाने येणाऱ्या कर्जमुक्तीला मते द्या आणि आपल्या परिसरातील सज्जन, देशप्रेमी व स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांची मते मिळवून द्या. ● ● ●

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**